## // प्रेस नोट //

दिनांक १९/०७/२०१८

**लोकसेवक निर्मल श्रीराम चव्हाण, वय ४४ वर्षे, धंदा नौकरी,तलाठी, सज्जा वाळुंज ता. आष्टी वर्ग-३, यांनी १०००/- रुपयाची लाच मागितल्याने गुन्हा दाखल.**

---

दि.०६/०७/२०१८ रोजी तक्रारदार यांनी अेसीबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की, तक्रारदार यांचे ७/१२ वरिल दुरुस्ती करुन फेरफारची नोंद करुन देण्यासाठी तलाठी चव्हाण हे १०००/- रुपयाची लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०६/०७/२०१८ रोजी आष्टी येथे पंचासमक्ष लाच मागणी बाबत पडताळणी केली असता तलाठी चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी १०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

परंतु लोकसेवक चव्हाण यांना तक्रारदारावर काहीतरी संशय आल्याने त्याने लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरुन लोकसेवक निर्मल श्रीराम चव्हाण, वय ४४ वर्षे, धंदा नौकरी,तलाठी, सज्जा वाळुंज ता. आष्टी वर्ग-३, यांनी १०००/- रुपयाची लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द पो.स्टे. आष्टी गु.र.नं. २३३/२०१८ कलम ७ ला.प्र.का. १९८८ प्रमाणे आज रोजी गुन्हा दाखल आहे.

नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| **टोल फ्री क्रमांक** | :- | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | :- | ०२४४२/२२२६४९ |
| **मेल आयडी** | :- | dyspacbbeed@gmail.com |
| **वेबसाईट** | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| **मोबाईल ॲप** | :- | www.acbmaharashtra.net |
| **फेसबुक पेज** | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

**(बाळकृष्ण हनपुडे पाटील)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.**